महाराष्ट्र निर्मितीचे तीन शिलेदार

दत्ताजी ताम्हाणे
दिनू रणदिवे
भाई वैद्य

मुलाखती
अरविंद बुधकर

महाराष्ट्र निर्मितीचे तीन शिलेदार

दत्ताजी ताम्हाणे

दिनू रणदिवे

भाई वैद्य

अरविंद बुधकर

ई साहित्य प्रतिष्ठान

महाराष्ट्र निर्मितीचे तीन शिलेदार

दत्ताजी ताम्हाणे

दिनू रणदिवे

भाई वैद्य

मुलाखतकार : अरविंद बुधकर
arvind_budhkar@yahoo. co. in
9820408553
श्री अरविंद रामचंद्र बुधकर
A3/102, विशाळगड को ऑप सोसायटी
कल्याण (प) पिन. 421301

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com
प्रकाशन : 1 मे 2016

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ज्या मासिकासाठी म्हणजे "कल्पक निवड " ह्या दिवाळी अंकासाठी मुलाखती घेतल्या होत्या

ते श्री सुधीर चव्हाण ह्यांचे निधन दोन वर्षापूर्वी झाले.

त्यांच्या स्मृतिला, प्रेरणेला हे पुस्तक अर्पण

त्यांनीच मला ही थीम दिली होती.

श्री. अरविंद बुधकर

संयुक्त महाराष्ट्र लढा एक वास्तव चित्रण -

“ कल्पक निवड” मासिकाचे संपादक (कै.)सुधीर चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने 2009 मध्ये मुलाखतींचा प्रस्ताव मांडला. आयत्यावेळी त्यांनी ठरविलेल्या व्यक्तीने नकार दिला. ही संधी चालून आलेली दवडायची नाही. आयुष्यात नवीन दालन उघडायचे ठरविले. वेळ 20 दिवसाचा होता. यादी मोठी होती. या निमित्ताने ह्या लढ्यात भाग घेतलेल्या लोकांना भेटता येईल, बोलता येईल आणि खरे स्वरूप, नेत्यांची जीवनशैली, मूल्ये, ध्येये, समाज आणि तरुण पिढी पुढे आणता येईल या उद्देशाने होकार दर्शविला. यादीमध्ये श्री दत्ताजी ताम्हाणे, श्री भाई वैद्य, श्री दिनू रणदिवे, मृणालताई गोरे, श्री प्रभाकर कुंटे, शाहीर साबळे, प्रा. एन डी पाटील, इ. ना भेटायचे होते. सर्व मंडळी वार्धक्याकडे झुकलेली, काही आजारी तर श्री पाटील निवडणुकीत गुंतलेले. अचूक संपर्काचा पत्ता, नंबर मिळवणे कठीण जात होते. मृणालताई गोरे, श्री प्रभाकर कुंटे, शाहीर साबळे, यांना आजारपणामुळे भेटता येत नव्हते. मनात अतीव आदर असूनही भेटता आले नाही ही सल नेहमीच मनात राहील. श्री दत्ताजी ताम्हाणे, श्री भाई वैद्य, श्री दिनू रणदिवे, यांना भेटता आले त्यांच्या मुलाखती घेतल्या.

मा. श्री दत्ताजी ताम्हाणे- एक तपस्वी, प्रसन्न व्यक्तिमत्व

मा. श्री दत्ताजी ताम्हाणे यांना भेटायचे ठरविल्यानंतर मनात एक गोड लहर उसळली. एका तपस्वी व्यक्तिमत्वाची भेट होणार, त्यांच्याशी गप्पा मारण्याची संधी मिळणार ह्याचा आनंद तर होताच पण कसे बोलायचे, काय बोलायचे याचे दडपणही होते. घरात पाऊल टाकताच प्रसन्न हास्य आणि स्वत:हून बोलणे ह्या अनपेक्षित स्वागताने दडपण दूर झाले त्यातच नात जावई श्री सतीश हा शालेय मित्र असल्याने दडपण पूर्ण दूर झाले. येण्याचे प्रयोजन सांगून गप्पांना प्रारंभ झाला आणि लढ्याच्या इतिहासात, वातावरणात कधी प्रवेश केला हे कळलेच नाही. गप्पांची सुरवात प्रश्नांनी झाली तरी "गप्पा" या अनौपचारिक काव्याच्या पंक्तीनेच त्यांनी केली

संयुक्त महाराष्ट्रची उद्दिष्टे आणि किती साध्य झाली हे विषद करताना त्यांनी स्वत:च्या जन्मापासूनचा आढावा घेताना म्हटले" माझा जन्म 1913 चा, स्पष्ट उद्दिष्टे अशी काही नव्हती. पण स्वातंत्र्याची चळवळ जोरात सुरू होती. 1928 मध्ये सायमन कमिशन ठाण्यात आल्यावर काळे बावटे दाखवायचे असे ठरले आम्ही ठाणेकरांनी रेल्वे स्टेशनवर काळे वावटे दाखवले. त्यावेळी मी अग्रेसर होतो. पोलिस आम्हाला पकडतील, शिक्षा होईल असे वाटले पण तसे काही झाले नाही. ह्या घटनेने खऱ्या अर्थाने राजकारणात प्रवेश झाला. आम्ही एकूण चार बंधु पण घरातून चळवळीत भाग घेण्यास संमती होती. सर्वार्थाने घरून काळजी घेतली जाईल असे आश्वासन होते. नंतर 1930 मॅट्रीकला असताना परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महात्मा गाँधीजीच्या नेतृवाखाली चळवळ सुरू झाली त्यासाठी 2 वर्षे पूर्ण दिली. 1933 मध्ये VJTI त प्रवेश घेतला. शिक्षण घेऊन पुढे काय करणार हे

निश्चित नव्हते. तेव्हाच युसुफ मेहेरअली, आचार्य नरेंद्र देव, डॉक्टर लोहिया व जयप्रकाश नारायण ह्यांच्या सान्निध्यात आलो व प्रभावित झालो. कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या निमिताने ह्या लोकांशी दाट परिचय झाला 1934 साली आचार्य नरेंद्र देव, अच्युतराव पटवर्धन. डॉक्टर लोहिया इ नेत्यांनी पुढाकार घेऊन "समाजवादी" पक्ष स्थापन केला. आमची खात्री झाली होती की स्वातंत्र्याचे आंदोलन कॉंग्रेस चालवू शकेल म्हणून त्या पक्षात राहून काम करायचे लोकांपर्यंत समाजवाद त्या माध्यमातून न्यावा हे उद्दीष्ट होते. कॉंग्रेस कडे खरा समाजवाद नव्हता. तळगाळातले आदिवासी, जंगलामधले मजूर ह्या सर्वांचे शोषण कंत्राटदार करत होते. ह्या लोकांकरीता काही तरी केले पाहिजे ह्या भावनेने आम्ही भारलेले होतो. स्वातंत्र्याच्या आंदोलनापासून दूर जाऊ नये म्हणून कॉंग्रेसमध्ये राहून त्यांच्या बरोबर सहभागी होतो. कार्य करीत होतो. स्वातंत्र्या नंतर प्रथम ठाणे जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांना मालकी हक्क मिळावा हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आदिवासींना संघटित केले. ह्यामुळे 1938-39 मध्ये मुरारजी देसाई यांनी कुळकायदा केला. स्वातंत्र्य कॉंग्रेसमुळेच मिळेल. आपण शक्ती दिली पाहिजे. त्या आधारे समाजवादी व्यवस्था स्थापन करण्याचे प्रयत्न सुकर होतील म्हणून कॉंग्रेस मध्ये राहणे पसंत केले. परंतु श्री स. का. पाटलांनी कॉंग्रेसमध्ये विरोध केला. म्हणून 1948 साली समाजवादी पक्ष बाहेर पडला. ह्या दृष्टीने अगोदर ठाण्यामध्ये डॉक्टर लोहिया, आचार्य नरेंद्र देव, श्री. एस एम जोशी, जयप्रकाश नारायण यांची तत्वचिंतनपर बैठक झाली.

त्यावेळचे राजकीय, सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक वातावरण आणि आताचे वातावरण यातील फरक विषद करताना म्हणाले, त्यावेळी लोकांना देशाबद्दल प्रेम वाटायचे. आपण स्वातंत्र्यासाठी योगदान करायला हवे. अशी भावना होती. त्यात आनंद मानायचे. सर्वच आंदोलनात भाग घेऊ शकत नव्हते. ठाण्यातील श्री रांगणेकर वकील, श्री माधवराव हेगडे हातगाडीवर खादी विकून स्वातंत्र्यासाठी मदत करायचे. प्रत्येकाला आंदोलनाशी संबंध ठेवावेत असे वाटे. महात्मा गांधींनी ग्रामीण विभागात विकास कामाचा विधायक कार्यक्रम दिला. त्यामुळे काही कार्यकर्ते ते काम करीत राहिले. मी जव्हार, डहाणू वाडा परिसरात काम करीत

होतो. आदिवासींना कुणी वाली नव्हता. मजुरी मिळायची नाही. जंगल तोडीची मजुरी मिळायची नाही म्हणून जंगल सहकारी कामगार संस्था स्थापन केली. ती संख्या 10-12 च्या आसपास होती. हे कार्य करताना आमचा संघर्ष गोदावरी परुळेकरांशी झाला. त्या विभागात त्याना मानणारा आदिवासी वर्ग फार मोठा होता. गोदावरी परुळेकरांच्या कामाची पद्धत हिंसक होती. बैलांच्या शेपट्या कापणे, आगी लावणे अश्या प्रकारची दहशत होती. आम्ही ही त्यांना हिंसेने प्रत्युतर दिले. त्यावेळी श्री बाळासाहेब खेर मुख्यमंत्री होते. त्यांचा राजकीय पाठिंबा आम्हाला होता.

एक सत्य घटना आहे की जंगलातील आदिवासींना गोदावरी परुळेकरानी धीट केले. गमतीची गोष्ट म्हणजे आंदोलनाच्या वेळी फोटोग्राफर च्या कॅमेराला तोफ समजायचे आणि पळून जायचे. त्यामुळे आमच्याबरोबर आदिवासी यायचे नाहीत. परंतु 1940 मध्ये गोदावरी परूळेकरानी आंदोलन केल्यावर पोलिसांनी गोळीबाराची धमकी देऊन सुद्धा आदिवासी हटले नाहीत ह्यावरुन गोदावरी परूळेकराच्या प्रभावाची कल्पना येते. दोघामध्ये समेट होण्यासाठी मी गोदावरी परूळेकराना भेटून बोर्डीला परिषद घेतली. समेट घडवून आणला. त्यावेळी गुंडगिरी नव्हती. रात्री 12 वाजेनंतर तरुण मुली कार्य करण्यासाठी यायच्या. आम्ही 1957 मध्ये आश्रम शाळा स्थापन केल्या.

आपला समाजवाद व कम्युनिस्टांच्या समाजवाद ह्यातील फरक करताना म्हणतात,
आमची विचारधारा कम्युनिझमच्या विरोधात होती तरी कार्य करीत होतो. आमचा विरोध त्यांच्या रशियाच्या बांधीलकीशी होता. आमचे विचार आमच्या देशाशी निगडीत होते. आजचे राजकारण म्हणजे व्यक्तिनिष्ठ. कुटुंबनिष्ठ व स्वहिताचे आहे. त्यावेळी मंत्र्याजवळ सामाजिक बांधिलकी होती. आता मी 5 वर्षात माझ्यासाठी काय करू शकेन, संपत्ती कशी मिळवीन हेच जास्त पाहिले जात आहे. ते पुढे बदलण्यासाठी बेकार तरुण पुढे होतील. तेच उठाव करतील व लढ्याचे अग्रदूत बनतील.

सामाजिक परिस्थितीची चर्चा करताना ते म्हणाले, त्यावेळी औद्योगिक विकास झाला नव्हता, शेतकरी हा शेतकरीच होता. अस्पृशता होती. त्यांना न्याय मिळावा म्हणून म. गांधीजींनी हरिजन सेवक संघ काढला. पूर्वीच्या काळी मध्यम वर्ग परिणामकारक होता. आताच्या काळात तो तसा नाही. आता एक तर खालचा वर्ग effective आहे किंवा अतिशय वरचा वर्ग. शासनाने पंचवार्षिक योजनेत मध्यम वर्ग डोळयासमोर ठेवला नाही. आता प्रभावी नेतृत्व नाही. नेतृत्वाला प्रखरपणा राहिला नाही. पूर्वीच्या नेत्यांच्याकडे त्याग होता. आम्ही पूर्वी नेत्यांसाठी काम करीत होतो. आता नेता आम्हाला प्रथम काय देणार ही भावना प्रबळ आहे. आताच्या नेतृत्वात प्रादेशिकता आहे. त्यामुळे प्रत्येक गटाची विशिष्ट pocket झालीत. पूर्वीच्या शैक्षणिक संस्थामध्ये, नेत्यामध्ये त्यागाची भावना होती. आता ती संपली. आज शिक्षणसम्राट स्वत:च्या स्वार्थासाठी संस्था काढतात. संपत्ती वाढवतात. मूल्ये लोप पावलीत. पूर्वीचे लोक स्वत:च्या पदरचा पैसा खर्च करीत उदा. कर्व्यांच्या हिंगणे येथील संस्थेचे देता येतील. ही परिस्थिती बदलण्यास शासनाने लक्ष घातले पाहिजे. हे सर्व बदलण्यास ज्यावेळी तरुणांची चळवळ अंतिम त्यागाला तयार होईल त्यावेळी रक्तलांछित कांती होईल. ही क्रांति नेतृत्वहीन होईल. बायबलमध्ये वचन आहे “God made cosmos out of chaos”

आजच्या लोकशाही व समाजवादाबद्दल म्हणाले, घटनेत आपण अनेक देशांच्या विशेषत: अमेरिका, कॅनडा ह्यांच्या कल्पना घेतल्या तरी आपली लोकशाही बहुतांशी ब्रिटनच्या धर्तीवर आहे. आपल्या घटनेला 60 वर्षे झाली. पुन्हा घटना समिती बोलावून त्यात बदल घडवायला हवा. अमेरिकेची घटना समोर ठेवून बदलायला लागणार आहे. अमेरिकेत Burocracy (नोकरशाहीला) फार मोठे अधिकार आहेत. संसदेने फक्त ठराव करावयाचे असतात. समाजवादाबद्दल म्हणायचे झाल्यास हा शब्द सुद्धा कालबाह्य झाला आहे. परिणामकारकता राहीली नाही. देशाला मार्गदर्शक असे नेतृत्व नाही. समाजवादी लोकांमध्ये संघटन वृत्ती व कौशल्य राहिलेले नाही.

आजच्या राजकीय नेतृत्वाकडून अपेक्षेविषयी म्हणाले, बलशाली भारत होवो विश्वात शोभूनी राहो हीच अपेक्षा आहे. तसा नेता तरी कुणी दिसत नाही. जे काही

नेते आहेत त्यांच्याकडे वैचारिक बैठक नाही. सखोल अभ्यास नाही. आजचे नेते स्वत:ची pockets करून आहेत.

आजच्या नेत्यांमध्ये काही लोक डॉक्टर लोहियाना मानणारे आहेत त्यांच्याविषयी ते म्हणतात, काही प्रादेशिक स्तरावर आहेत त्यांना जनाधार नाही. समाजाबद्दल त्यांना देणे घेणे नाही. बलशाली भारत होण्यासाठी महान नेतृत्व हवे. असा नेता महान संघर्षातून निर्माण होतो.

स्त्री नेतृत्व विकासाबद्दल ते म्हणतात, म्हणावे तसे स्त्री नेतृत्व नाही. (मेधा पाटकर, तिस्ता सेटलवाड अशा काही स्त्रियांची नावे सांगताच) मेधा पाटकर, प्रतिभाताई पाटील(राष्ट्रपती) महिला आहेत पण त्यांच्याकडून विशेष काही शिकायला मिळत नाही. (मध्येच मी ग्रामीणभागात काही स्त्रिया गावामध्ये सरपंच झाल्याचे सांगताच) म्हणाले ग्रामपंचायती असाव्यात. त्यांना अधिकार असावेत. पुरुष प्रभावामुळे परिणामकता येत नाही. (आरक्षणाचा मुद्दा पुन्हा छेडताच) नुसतेच आरक्षण झाल्याने नेतृत्व विकसित होणार नाही. त्यात अन्यायाविरुद्ध प्रखर झगडायला हवे, समर्पण व्हायला हवे. त्यातूनच नेतृत्व निर्माण होईल.

आज आपल्या सामाजिक व शैक्षणिक चळवळ योग्य मार्गाने चालल्या आहेत का असे विचारताच दोघांमध्ये प्रश्न प्रतिप्रश्न येऊ लागले

त्यांचा सामाजिक चळवळ म्हणजे काय असा मला प्रतिप्रश्न

मी – हुंडाबंदी, रूढी परंपरा अंधश्रद्धा याबद्दल

श्री दत्ताजी – ह्या काही अंशी आहेत. पण परिणामकता नाही. काही ठिकाणी pockets सारखी अवस्था आहे. चळवळीत झोकून देण्याची प्रवृती होती ती आता नाही.

मी – ह्याचे कारण काय ?

श्री दत्ताजी- राजा कालस्य कारणम ! सत्ताधारी चांगला असला पाहिजे. (लोककथेचा आधार घेत) पूर्वी राजा वेषांतर करून प्रजेत काय चालले आहे ह्याचा शोध घ्यायचा. त्याची प्रशासन व्यवस्था बरोबर काम करते आहे की नाही हे शोधायचा.

मी – (मध्येच थांबवत) आजच्या लोकशाही व्यवस्थेत मंत्री असे करू शकतील?

श्री दत्ताजी- ते स्वत:मध्ये जास्त गुंतले आहेत. जेव्हा आपले मंत्री एक पोलिस गाडी घेऊन समाजात फिरतील ती खरी लोकशाही असे म्हणेन. थोडक्यात सत्ताधाऱ्यांनी चळवळीला संपूर्ण आणि विशुद्ध पाठिंबा द्यायला पाहिजे.

मी- आजच्या शैक्षणिक चळवळी बद्दल काय ?

श्री दत्ताजी- ह्या चळवळी मर्यादित आहेत. मग त्या कुठल्याही असोत. शैक्षणिक चळवळ ही चळवळ न राहता त्यात बाजारी प्रवृतीच जास्त आहेत. संपत्तीसम्राट कसं लवकर होईन हाच हेतू प्रभावशाली आहे

मी- हे कसे बदलायचे ?

श्री दत्ताजी- पूर्वीच्या काळी ऋषीसत्ता होत्या त्या राजावर अंकुश ठेवीत.

मी – आता कसे होणार ? आजचे विचारवंत ऋषींची जागा घेऊ शकतील ?

श्री दत्ताजी- आजच्या विचारवंतांनी निर्भयपणे एकत्र यायला हवे. चारित्र्यसंपन्न, सुशिक्षित विचारवंतांनी एकत्र येऊन मोकळेपणाने चर्चा करावी. असा लोकांचा प्रभावशाली गट तयार व्हायला हवा. त्यात स्वत:चे व्यक्तित्व किंवा अहंपणा, स्वार्थ असता कामा नये. तरच काही बदल होऊ शकतील. ते शासनावर अंकुश ठेवू शकतील. माधव जूलियन यांच्या कवितेतील डोह व नदी यांचे उदाहरण घ्या. समृद्ध डोह एकाच जागी आहे, पण तो नदी कुठे गडप झाली ते शोधत आहे. नदीचा प्रवाहीपणा कुठेच दिसत नाही. तेच आजच्या बुद्धिवंताबद्दल आणि विचारवंताबद्दल झाले आहे.

महाराष्ट्र कर्नाटक सीमावादं संपून खरेच संयुक्त महाराष्ट्र होईल का तेव्हा एकदम म्हणाले “आता ही गोष्ट सोडून द्या. कधीच होणार नाही. त्यावेळी असलेला तरुण वर्ग शिकून मोठ्या पदांवर नोकऱ्या करून स्थिर झाला आहे. त्याला आता काही देणे घेणे नाही. “

मध्येच मी “ तिथले लोक आता आंदोलन करताना दिसतात त्याचे काय? “

श्री दत्ताजी- काही लोक आपले अस्तित्व दाखविण्यासाठी मधेच असे काही करून आरोळी ठोकतात. ही लहानशी विस्तवाची धुगधुगी आहे. राजकारण्यांनी सोयीस्करपणे हा वाद न्यायालयाच्या शीतगृहात गुंडाळून ठेवला आहे. विस्मृतीत गेला आहे.

शेवटी असे वाद होऊन लागल्यावर राष्ट्रीय ऐक्य कसे राहणार यावर ते म्हणाले एखादे भारत पाक युद्ध झाले तर लोक पुन्हा एकसंघ होतील. लोक पुढाकार घेतील. आजचा सुशिक्षित बेकार तरुण क्रांतीचा अग्रदूत असेल.

श्री दत्ताजीचा उत्साह संपत नव्हता. वय वर्षे 96 तरी अफाट कार्याची ऊर्जा. बुद्धी तल्लख माधव जुलियन, मोरोपंतांच्या आर्या तोडपाठ. चर्चा करता करता त्यांच्या विनोद बुद्धीचा झरा ही वाहत होता. त्यांनी केलेली विडंबन काव्ये ही मधेच म्हणून दाखवत मधे मधे श्री सतीशची पत्नी विनोदी गप्पामधे कधी प्रसंग सांगून कवितेची आठवण करून देत रंगत आणत होती. खरे तर उठावेसे वाटत नव्हते पण दुपार चढत होती. त्यांची झोपायची वेळ पाहून कुठेतरी थांबायला हवे म्हणून मी पुन्हा गप्पा मारण्यासाठी येईन असे म्हणालो तेव्हा " कदाचित ही माझी शेवटची मुलाखत असेल असे म्हणून कालाय तस्मै: नम: " असे म्हणाले तेव्हा जड पावलांनी बाहेर पडलो.

दोन्ही फोटो श्री दत्ताजी यांचा 100 व्या वाढदिवशी घेतलेले खालील फोटोत समवेत श्री अरविंद बुधकर

मा. श्री दिनू रणदिवे

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात प्रचंड दडपशाही चालू असताना त्या प्रतिकूल परिस्थितीत मराठी जनतेसाठी संयुक्त महाराष्ट्र पत्रिका धैर्याने चालवणारे ज्येष्ठ पत्रकार श्री दिनू रणदिवे यांची मुलाखत घ्या असे संपादकाने सांगितल्यावर मी खूप आनंदित झालो. श्री दिनू रणदिवे यांचे अभ्यासपूर्ण लेख नेहमीच लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, महानगर इ. दैनिकातून अनेकवेळा माझ्या वाचनात आले आहेत. कशी असेल व्यक्ति? आपणास वेळ देईल का? असे अनेक प्रश्न मनात येत होते. म्हणून भेटीसाठी फोन केला. आधी त्यांनी "लिखित प्रश्न पाठवा. मी लिखित स्वरुपात मुलाखत पाठविन." असा खुलासा केला. "मला, आपली व्हिडिओ शुटींग करून मुलाखत घ्यायची आहे." मी त्यांचा पिच्छा सोडत नव्हतो. पलीकडे फोनवर त्यांचे उत्तर, " अहो घरी या पहा म्हणजे कळेल. तुम्ही तसल्या काही फॉरमॅलिटीज करू नका. मी प्रश्नांची उत्तरे लिहून ठेवली आहेत. बाकी चर्चा करू.

वेळेआधी 20 मिनिटे घरी पोहचलो. व्हिडिओ शूटिंग का नको याचे उत्तर मिळाले. घरात सर्व ठिकाणी अनेक वर्षांचे जुने वृत्तपत्रे, त्यांचे ढीग त्यात त्यांचे 13 x 10 खोलीतील पतिपत्नीचे दीर्घकाळ वास्तव्य. जुन्या वृत्तपत्रांच्या गठ्ठ्यांवर नजर फिरवली, तेव्हा त्यांच्या बहुश्रुततेची खात्री पटली.

पेपरकडे पाहत मी प्रश्न केला " हे सर्व जुने पेपर ठेवण्याचे प्रयोजन ?

पुस्तकांमध्ये सगळेच खरे व सविस्तर नसते. पण पेपरमधील लिखाण बातम्या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकतात. चर्चेला आपोआप सुरवात झाली, .

आपण मूळचे कुठले? शिक्षण कुठे झाले ? चळवळीत, पत्रकार व्यवसायात कसा प्रवेश झाला?

मी ठाणे जिल्ह्यातील चेंदणी गावचा. 1944 साली मॅट्रिक झालो. आंदोलनात भाग घेतल्यामुळे शाळा सुटली. पुढे रुईया कॉलेज मधून 1944 ते 1948 या काळात BA झालो. MA केले. नंतर socio economic सर्वे करणाऱ्या Research संस्थेमध्ये Investigator म्हणून नोकरी मिळाली. तीही आंदोलनात भाग घेतल्यामुळे गेली. कालांतराने आंदोलांनातल्या परिचयातून लोकमान्य मध्ये पत्रकार म्हणून सुरवात झाली. आधी आंदोलन थोडे दिवस चालेल मग संपून जाईल पुन्हा शिक्षण करता येईल असे वाटले. पण जे घडले ते सर्वश्रुत आहे. नंतर महाराष्ट्र टाइम्स मध्ये जून 1962 मध्ये लागलो. सप्टेंबर 1985 मध्ये निवृत झालो.

मला वय जरी मोठे असले तरी काका मामा न म्हणता सरळ रणदिवे म्हणा असा आग्रह करून वातावरण आणखी मोकळे केले.

याच लहानशा खोलीतून लिखाण करता?

“ होय येथेच सर्व. ”

संयुक्त महाराष्ट्राची पार्श्वभूमी व उद्दिष्ट-

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्याने 1 मे 1960 रोजी राज्यात सर्वत्र आनंदोत्सव साजरा केला जात होता. परंतु हे राज्य स्थापन झाल्याने प्रत्यक्ष काही घडले असल्याचे लोकांनी अनुभवले असल्याचे त्या दिवशी काही घडले नाही. लोकांना भावनात्मक आनंद मिळाला. जवळजवळ 6 वर्षे चालू असलेल्या संघर्षाचा शेवट झाला. एवढेच दिसत होते. वाटले होते की त्या दिवसापासून आठवणीत राहील असे काही घडेल. परंतु तसे काही झाले नाही. काही किरकोळ सवलती त्या दिवशी मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांनी जाहीर केले. महात्मा गांधीजींच्या खुनानंतर लोकक्षोभामुळे काही विशिष्ट समाजातल्या मंडळींची घरेदारे जाळली गेली. सरकारने त्यांना पुन्हा नवे आसरे उभारण्यासाठी काही कर्ज दिले. परंतु परत फेडीच्या अटीवर. काहींना ती मदत पूर्णांशाने परत फेडता आली नव्हती. अशा कुटुंबाची बाकी माफ केली गेली. त्यापलीकडे काय? कारभार हळूहळू सुरू होईल मुंबई विद्यापीठाचे माध्यम कालांतराने बदलण्याच्या प्रक्रियेस्स सुरवात होईल अशी सरकारने आश्वासने दिलीत. परंतु लगेच काही घडले नाही. इतकेच नव्हे आजही विद्यापीठात उच्च न्यायालयात इंग्रजीच कायम आहे. मराठी राज्य स्थापन झाल्यानंतर 50 वर्षांनंतर ही परिस्थिती आहे.

सरकारची इच्छा असली तर कारभारात बदल करता येतो. 4 जानेवारी 1948 रोजी आपल्याप्रमाणेच ब्रिटीशांच्या गुलामीत असलेला ब्रम्हदेश स्वतंत्र झाला आणि त्या दिवसापासून तेथील कारभार, शिक्षण सर्वकाही ब्रम्ही भाषेत करण्याचे राष्ट्राचे प्रमुख Ongsaan (औग्सांन) यांनी जाहीर केले. (ब्रम्हदेशास आता म्यानमार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या देशातील काही निर्बंध उठविले जावेत यासाठी लढत असलेल्या श्रीमती सू की यांचे हे वडील) स्वातंत्र्यप्राप्ती होत असतानाच त्यांचा खून झाला. समाजवादी राजवट देशात आली असे लोकांना जाणवावे म्हणून आर्थिक बदल केले. परंतु आपल्याकडे तसे काही झाले काय? तेथील तांदूळ आणि सागवानी लाकूड हि प्रमुख शेतीचे उत्पादने ह्या दोन्ही वस्तूंच्या व्यापाराचे संपूर्णत: राष्ट्रीयकरण Ongsaan (औग्सांन) यांनी केले होते.

राजकीय परिस्थिती –

देशात घटनेनुसार आपण संघराज्यात आहोत. महाराष्ट्रास काही बदल करावयाचे असल्यास घटनेनुसार काही बाबतीत केंद्राची संमती घ्यावी लागणार. परंतु काही

गोष्टी अशा आहेत की केंद्राकडे पूर्वसंमती घ्यावी लागत नाहीत. ही घटनात्मक अट अथवा अडचणी टाळूनही महाराष्ट्रास बरेच काही करता आले असते. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन यशस्वी होण्याचे कारण म्हणजे मुंबईतील गिरणी कामगारांचा त्यातील सहभाग. हे आंदोलन 6 वर्षे (1955 ते 60) चालले. गिरणी कामगार आणि मुंबईतील दलित समाज यांनी यात भाग घेतला नसता तर ते यशस्वी झाले असते काय या बद्दल शंका वाटते.

पहिली गोष्ट अशी की या आंदोलनाला केंद्र सरकारचा विरोध होता. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीस केंद्राचा विरोध होता. हे आंदोलन दडपून टाकण्यासाठी राज्य सरकारने पोलिस दलाचा हवा तेवढा वापर करून घेतला. 106 निदर्शकांचे प्राण घेतले. गोळीबारांमुळे जखमी किती झाले याची तर गणतीही झाली आही. ज्या कामगारानी एवढा मोठा त्याग केला त्याची जाणीव ठेवून त्यांच्यासाठी काही करावयाला नको होते काय?

पोलिस अत्याचार तर अनन्वित होते. प्रभात दैनिकाचे संपादक वा. रा. कोठारी यांनी या प्रकरणी विधानसभेबाबत काही लिहिले असताना त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाची सूचना आणण्यात आली होती. त्यांनी सभागृहाचा अवमान केला, त्या सभागृहाची अप्रतिष्ठा केली असा त्यांच्याविरुद्ध आरोप ठेवण्यात आला होता. त्याबाबतची सुनावणी झाली. त्यावेळी आपली भूमिका मांडताना कोठारी म्हणाले होते " या सभागृहात प्रतिष्ठेचे स्वरूप ब्रिटिश पार्लमेंटप्रमाणे राहील असे घटनेत दर्शविले आहे. पण इंग्लंडमध्ये एका दिवसात 100 वेळा गोळीबार करणारा गृहमंत्री नव्हता किंवा 1045 वेळा गोळीबार झाला तरी चौकशीची मागणी धुडकावून लावणारा मुख्यमंत्री नव्हता. पॉलिसी अत्याचारांना बळी पडलेले बहुतेक सर्व श्रमिक होते. त्यात गिरणी कामगारांची संख्या मोठी होती. असे हे गिरणी कामगार बेकारीच्या संकटात सापडले होते. त्यांना संरक्षण देण्यासाठी इतर घटकांनी काय केले? सरकारने त्यांच्याबाबत काही कृतज्ञंता दाखवली काय?

गिरणी कामगार आणि दलित ही श्रमिकांची हुकमी शक्ती होती. राज्य पुनर्रचनेपूर्वी मुंबईतील धनिकांची भूमिका या राज्याच्या निर्मितीस विरोध करणारी होती. इंडियन मेर्चंट्स चेंबरच्या आधारे मुंबई स्वतंत्र ठेवण्यासाठी प्रामुख्याने प्रमुख उद्योगपती व व्यापारी यांची समिती ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नेमली होती. त्या समितीतर्फे (मुंबई नागरिक समिति) मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीस जाहीरपणे विरोध केला जात होता. सर्व इंग्रजी वृत्तपत्रे मुंबई

महाराष्ट्रास मिळण्यास विरोध करीत होती. इतकेच नव्हे तर विधिमंडळात ज्यावेळी यासंबधी चर्चा झाली त्यावेळी कॉंग्रेस सरकारने भूमिका आणि राज्य पुनर्रचनेबाबत या समितीची भूमिका यांच्यात काही फरक असल्याचे जाणवले नाही. ही अशी त्यावेळची परिस्थिती होती.

कॉंग्रेस व श्री यशवंतराव चव्हाणांची दुट्टप्पी धोरणे –

मुंबईत झालेल्या गोळीबाराबाबत विरोधी आमदारांची विधानसभेत चर्चा होत असताना महाराष्ट्र विभागातील (त्यावेळी मुंबई राज्य गुजरातसह होते) मराठी भाषिक कॉंग्रेस आमदारांनीही सरकारवर टीका केली नाही. त्यावेळी विरोधी आमदारांनीच हा प्रश्न उचलून धरला होता. श्री यशवंतराव चव्हाण त्यावेळी मंत्री असताना त्यांनी या अत्याचाराबाबत मौन पाळणे पसंत केले.

श्री यशवंतराव चव्हाणांचे फोडाफोडीचे राजकारण –

संयुक्त महाराष्ट्र समितीची आंदोलन काळात विशिष्ट भूमिका होती. परंतु महाराष्ट्र राज्य निर्माण होत असताना श्री चव्हाण त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने विरोधी पक्षातील आमदारांनाच फोडले. याबाबत मोठे उदाहरण म्हणजे समितीचे पुण्यातील आमदार राम तेलंग यांना कॉंग्रेसने (1962) फोडून पुढील निवडणुकीच्या वेळी त्यांना पुण्यात समितीचे सुत्रधार श्री एस एम जोशी यांच्याविरुद्ध विधानसभा निवडणुकीत उभे केले आणि एस एम पराभूत होतील अशी व्यवस्था केली. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला खरा परंतु या राज्यास आंदोलनाच्या काळात विरोध करणारा कॉंग्रेस पक्षच सत्ताधारी झाला. त्यामुळे आंदोलनाच्या काळात जी विचारसरणी संयुक्त महाराष्ट्र समितीने जनतेपुढे ठेवली होती ती बाजूला पडली.

आंदोलन 1

आंदोलन एवढ्या मोठ्या प्रमाणावर होईल अथवा करावे लागेल असे कुणालाही वाटले नव्हते. बेळगाव साहित्य संमेलनात मराठी भाषिकांचे राज्य निर्माण

करण्याची योजना संमेलनाध्यक्ष श्री ग त्र्य माडखोलकर यांनी मांडली. त्या योजनेची पूर्तता करून घेण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना मुंबईत करण्यात आली. या परिषदेत महाराष्ट्रातील सर्व पक्षांचे प्रतिनिधी होते. परिषदेचे अध्यक्ष श्री शंकरराव देव ते तर त्यावेळी अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे पदाधिकारी होते. सार्वजनिक क्षेत्रातील विचारवंत श्री दादासाहेब धर्माधिकारी, दत्तो वामन पोतदार तसेच भाऊसाहेब हिरे, श्री यशवंतराव चव्हाण प्रभूती त्यावेळचे कॉंग्रेसचे नेते या परिषदेत होते. भाषिक तत्वावर राज्याची पुनर्रचना करणे हे तर कॉंग्रेसचे धोरण होते आणि त्या धोरणाशी सुसंगत अशी संयुक्त महाराष्ट्र परिषदेशी मागणी होती.

आंदोलन 2

मात्र या आंदोलनामागे मुंबईतील बडे उद्योगपती आणि व्यापारी यांना काही कारस्थान वाटले त्याला कारण काय होते हे त्यांनाच माहीत.

आपले हितसंबंध सुरक्षित रहावेत यासाठी व्यापारी उद्योगपती यांनी मुंबई नागरिक समिति स्थापन केली. त्यावेळच्या परिस्थितीनुसार आर्थिक क्षेत्रात गुजराती भाषिकांचा वरचष्मा होता. त्यामुळेच या मागणीच्या मागे गुजराती मराठी वाद अकारण निर्माण झाला. त्यावेळी आर्थिक क्षेत्रात मारवाडी (राजस्थानी) बरेच होते. परंतु त्यांना चुकूनही मराठी राज्य स्थापन झाल्यास आपले हितसंबंध धोक्यात येतील असे वाटले नव्हते. मग मुंबई महाराष्ट्रात राहिल्यास आपले हितसंबंध धोक्यात येतील असे धंनिकांना का वाटले? याला उत्तर काही नाही. तो उत्तर मुंबई नागरिक समितीकडेही नव्हते.

आंदोलन 3

महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यास मुंबई महाराष्ट्रातील व्यापारी उद्योगपती यांचे हितसंबंध धोक्यात येतील असे दर्शविणारे काही ही घडले नव्हते. मग असे का घडावे? व्यापारी उद्योगपती यांना तशी भीती (निराधार) वाटल्यास त्यांच्या मनात काही काल्पनिक भीती असावी. परंतु केंद्र सरकारही वेगळा विचार आधीपासून का करीत होते?

गोव्यातीलं सत्याग्रह – हे संयुक्त महाराष्ट्राचे मूळ प्रेरणास्थान –नागरिकांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया

15 ऑगस्ट 1955 रोजी गोव्यात सामूहिक सत्याग्रह झाला. त्यावेळी तेथील पोर्तुगीज सरकारने हा सत्याग्रह दडपून टाकण्यासाठी लष्कराने बरीच दडपशाही केली. या निर्दय अशा दडपशाहीचे वृत्तान्त सर्वत्र पसरताच साहजिकच त्या विरुद्ध प्रतिक्रिया झाली. मुंबईतील नागरिकांनी या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी मुंबईतील पोर्तुगाल वकिलातीपुढे उग्र निदर्शने केली.

आंदोलन 4

तसेच भारत सरकारने गोव्याचा प्रश्न अकारण लोंबकाळत ठेवला. त्यामुळेही गोव्यात अत्याचार झाले असे मुंबईतील जनतेला वाटल्याने मुंबईतील मंत्रालयापुढे निदर्शने करण्यात आली. गोव्यातील दडपशाहीविरुद्ध तेथील अमानुष गोळीबाराविरुद्ध मंत्रालयापुढे जनतेने निदर्शने करताच ती दडपून टाकण्यासाठी येथील कॉंग्रेस सरकारनेही गोळीबार केला.

परंतु मुंबईतील या उग्र अशा निदर्शनावरून पंतप्रधान नेहरू यांनी वेगळाच समज करून घेतला. दोन दिवसांनी उत्तर प्रदेशात एका ठिकाणी ते भाषण करताना संतापाने म्हणाले, "मुंबईत जे घडले त्यावरून असे वाटते राज्य पुनर्रचना मंडळाच्या शिफारसी नंतर काय घडणार त्याची रंगीत तालिम म्हणजे ती निदर्शने होत. "

आंदोलन 5

पंतप्रधान नेहरू यांनी अशी समज का करून घेतली हे त्यांचे त्यांनाच माहीत. परंतु त्यांच्या या वक्तव्यामुळे जनतेची अशी भावना झाली की मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती अगदी सहजपणे होण्याची लक्षणे नाहीत. त्या मंडळाचा अहवाल ऑक्टोबर मध्ये(1955) प्रसिद्ध होण्याच्या वेळी मुंबईत महाराष्ट्रात काही घडत नव्हते. तरीही ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मुंबईत सर्वत्र पोलिस पहारा

बसविला गेला. शहरात शांतता असताना एवढा कडक पहारा का अशी लोकात चर्चा सुरू झाली. 10 ऑक्टोबर 1955 रोजी तो अहवाल केंद्र सरकारने जाहीर केला. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा तसेच एक भाषिक राज्याऐवजी भाषिक राज्य (महाराष्ट्र+गुजरात आणि विदर्भ वेगळा) निर्माण करण्याची त्या मंडळाची शिफारस पाहून मुंबई – महाराष्ट्रात प्रचंड असंतोष निर्माण झाला. तरीही येथे गैर असे काही घडले नाही.

आंदोलन 6

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती नाकारणारी रा. पु. मंडळाची शिफारस जाहीर होताच असंतोष वाढत गेला. या वाढत्या असंतोषामुळे संयुक्त महाराष्ट्रवादयांची शक्ती आणि संघटना वाढत गेली. प्रारंभीची मोठी निदर्शने तर कामगार संघटना कृती समितीच्या नेतृत्वाखाली सुरू झाली. 18 नोव्हेंबर ते 21 नोव्हेंबर रोजी या कृती समितीतर्फे विधानभवनापुढे उग्र निदर्शने झाली. 21नोव्हेंबरला गोळीबारामुळे 15 निदर्शकांना प्राण गमवावे लागले. जखमींची गणती झाली नाही.

आंदोलन 7 –

या प्रश्नाबाबत जनतेत किती क्षोभ निर्माण झाला होता त्याची दखलही कॉंग्रेस तर्फे चालविल्या जाणाऱ्या केंद्र व राज्य सरकारने घेतली नाही. याउलट कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते स. का. पाटील यांनी तर 20 नोव्हेंबर रोजी चौपाटीवर भाषण करताना संयुक्त महाराष्ट्रासाठी निदर्शने करणाऱ्यांना इशारा दिला की मराठी लोक असेच बागणार असतील तर मुंबईसह महाराष्ट्र त्यांना 5000 वर्षांनंतरही यावत्चंद्र दिवाकारौ मिळणार नाही. जनतेच्या अशा निदर्शनांची दखल न घेता केंद्राने 16 जानेवारी रोजी त्रिराज्य योजनेचा निर्णय घेतला. लगेच मुंबईत महाराष्ट्रात जोरदार निदर्शने सुरू झाली. सरकारने अमानुष अशी दडपशाही सुरू केली. सरकारच्या या निर्णयास संघटितपणे विरोध दर्शविण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समिति 6 फेब्रुवारी 1956 रोजी स्थापन करण्यात आली. समितीतर्फे राज्यभर सत्याग्रह सुरू झाला. 30000 सत्याग्रहीना अटक झाली.

आंदोलन 8

या आंदोलंनांनंतर मागणी झाली समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र निर्माण करू. आंदोलनाची विचारसरणी निश्चित होत गेली. हेच आंदोलनाचे उद्दिष्ट होते.

आतापर्यन्त सर्व लिखित स्वरूपाची मुलाखत होती. त्यांचे विचार समजून घेण्यासाठी काही प्रश्न विचारले :

आजच्या लोकशाही व समाजवादाबद्दल आपण काय म्हणाल ?

आज लोकशाही किंवा समाजवाद या गोष्टी शिल्लक राहिल्या नाहीत सर्व खाजगीकरण आहे. माणसे फोडून संख्या वाढवायची. बेडकासारख्या उड्या मारायच्या ही काय लोकशाही आहे.

मी- लोकांना बोलण्याचे लिहिण्याचे स्वातंत्र्य आहे

श्री रणदिवे – मी आपले श्री यशवंतराव मोहिते जे आताच निवर्तले त्यांचे उदाहरण सांगतो पूर्वी ते शे. का. पक्षात होते. ते संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे निवडून आले होते. 1960 मध्ये श्री यशवंतराव चव्हाण कराडला श्री मोहित्यांच्या पत्नीला जाऊन भेटले. त्यांना मंत्री करतो तुम्ही त्यांना पक्षांतराला राजी करा. संमती द्या. मुंबईत येऊन त्यांच्या मंत्रिपदाची घोषणा केली. असे आहे श्री यशवंतरावांचे धोरण. सगळीकडे फोडफोडी जी आजही आहे. ही काय लोकशाही?

मी- आजच्या शैक्षणिक वातावरणाबद्दल काय म्हणाल ?

(श्री रणदिवे- मी काही सर्व क्षेत्रातील तज्ञ नाही त्यामुळे अनेक चालू घडामोडीवर भाष्य करणार नाही) तरी प्रश्न पुढे रेटला.

श्री रणदिवे- महाराष्ट्रात शिक्षणविषयक धोरण नाही. शाळा, शिक्षकांनी मुलांचे भवितव्य डोळ्यासमोर ठेवून शिक्षण दिले पाहिजे. तामिळनाडूमध्ये 10वी ची परीक्षा झाली की लगेच सरकारचे education dept प्रेस नोट्स काढते. परीक्षा घेतली जाते. काही मुले पास होतात. ह्याला improvization म्हणतात. विद्यार्थ्यांचे वर्ष फुकट जाऊ नये हे सरकारचे धोरण असते. विद्यार्थी पेपर लिहीत असताना किंवा शिक्षक पेपर तपासताना अनेक गोष्टींचे तणाव मनावर असतात. त्यात काहीवर अन्याय होतो.

मी- आपल्या राजकीय नेतृत्वाकडून काय अपेक्षा आहेत ?

श्री रणदिवे- व्यवहार्य धोरण ठरविणारा पक्षाचा नेता हवा.

मी- आजचे स्त्री नेतृत्व कसे विकसित करता येईल ? आरक्षण त्याला उपाय आहे काय ?

श्री रणदिवे- स्त्री नेतृत्वा बद्दल मी फार विचार केला नाही. त्यावर माझा अभ्यास नाही. प्रगत देशात किती स्त्रिया नेतृत्व करीत आहेत? फार थोड्या आहेत. काही बाबतीत आरक्षण केले तर होईल. पण त्या संबंधी काही कालमर्यादा ठरवावी लागेल. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी 10 वर्षासाठी आरक्षण असावं असे धोरण आखले. पण आता काय चालले आहे हे सर्व उघड आहे.

मी- संयुक्त महाराष्ट्र होईल का? केव्हा?

श्री रणदिवे- झालाच पाहिजे.

मी- कसा होईल? आज सोईस्करित्या मध्येच आरोळी थोकतात; नंतर विसरून जातात. न्यायालयात प्रश्न नेऊन प्रलंबित ठेवला आहे. अशा परिस्थितीत कसा होणार? त्या काळातील बेळगाव, निपाणीतील मूठभर लोक आंदोलन करतात. त्यांना कोण साथ देतो. काही लोक नोकरी धंद्यात उच्चपदावर स्थिरावलेत. ते काही करताना दिसत नाहीत.

श्री रणदिवे- महात्मा गांधींनी बेळगावमध्ये अधिवेशनात ठराव केला की सर्व व्यवहार तिथल्या भाषेत झाले पाहिजेत. आपल्या लोकांकडे प्रामाणिकपणा कमी आहे. तामिळनाडूमध्ये न्यायालयाचे काम स्थानिक भाषेत चालले पाहिजे असे सरकारने सांगितले तेव्हा न्यायमूर्ती श्री शहा मुख्यमंत्र्यांना म्हणाले, आम्हाला टाईपरायटर, इ. मूलभूत गोष्टी द्या मी करतो प्रादेशिक भाषेत व्यवहार सुरू झाले आहेत. तेच आंध्र प्रदेशमध्ये. श्री पट्टाभी सीतारामय्या यांनी 1933 मध्ये प्रादेशिक भाषिक व्यवहाराची चळवळ केली. पण जेव्हा ते राज्य पुनर्रचना परिषदेत आले तेव्हा ते बदलले. भाषिक राज्ये असू नयेत असे म्हणालेत. तीच गत महाराष्ट्रात राज्यकर्त्यांनी केली. बेळगावात सर्व मराठी लोक येतात पण आपल्या गोष्टीचे ते

विसर्जन करतात. श्रीलंकेत सर्व सार्वजनिक ठिकाणी सिंहली भाषेत व्यवहार चालूच आहेत. मग वाद कुठला?

मी- आज मराठीबद्दल काही लोक चळवळ करतात त्याबद्दल काय?

श्री रणदिवे- आज त्यांनी महाराष्ट्राला 40 वर्षे मागे नेला आहे.



मुलाखत संपता संपता सौ वहिनींनी चहा दिला. त्याही वयस्कर असूनही उत्साही वाटल्या. लहान खोलीत आनंदाने सर्व गोष्टी करीत होत्या. श्री रणदिवे 86 वर्षे वयाचे आहेत. तोच पूर्वीचा उत्साह दिसून येत होता. संयुक्त महाराष्ट्र पत्रिकेतील लिखाणाची फोटो कॉपी मी घेऊन येतो असे म्हणताच त्यांनी मीच तुझ्या बरोबर खाली येतो असे म्हणत कठंड्याचा आधार न घेता जिना भराभरा उतरु लागले. फोटो कॉपीचे पैसेही मला देऊ दिले नाहीच पण वयाचा मान राखून त्यांना नमस्कार करायला गेलो तर असे करू नका हे उद्गार. त्यांच्या कडे पहात असताना एकच गोष्ट मनात रुंजी घालत होती ती म्हणजे " असाच उत्साह प्रामाणिकपणा, अभ्यासूपणा, नि:स्वार्थीपणा, निष्ठा आजच्या राज्यकर्त्यांकडे, आमच्या सारख्या तरूणांकडे असेल तर समाज व राष्ट्र बदलण्यास वेळ लागणार नाही. "

****

मा श्री भाई वैद्य – उत्साहाचा झरा

श्री भाई वैद्य यांच्याशी संपर्क साधण्याअगोदर भीती होती की पुण्यात ते भेटतील किंवा नाही. आदल्या रात्री 10 वा. फोन केल्यावर

ते कोल्हापूर गोवा रस्त्यावर प्रवासात होते. कल्पक निवड ह्या दिवाळी अंकासाठी संयुक्त महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव या निमिताने मुलाखत घ्यायची आहे असे सांगितले. मी कामासाठी पुण्यात येत आहे आणि संध्याकाळी पुन्हा जाणार असे सांगितले. त्यांनी पुण्यात मध्यरात्री पोहचत असून रविवारचा कार्यक्रम सकाळी अगोदर ठरलेल्या फोनवर अवलंबून आहे. तसेच संध्याकाळी 4. 30 वा पुन्हा दुसरी मीटिंग आहे असे सांगितले. रविवारी सकाळी पुण्यात पोहचताच संपर्क साधला. तेव्हा दुपारची वेळ दिली. मनातून आनंद झाला. वय वर्षे 82 असूनही प्रवासाचा शीण असूनही दुपारची विश्रांती कमी करून त्यांनी मला वेळ दिली. औपचारिकता बाजूला ठेवून मुलाखतीस प्रारंभ केला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे उद्दिष्ट विषद करताना म्हणाले, श्री एस एम जोशी यांच्या नेतृत्वाखाली जेव्हा संयुक्त महाराष्ट्र समिती निर्माण झाली तेव्हा पुण्यात कार्यालय स्थापन झाले. श्री एस एम जोशी स्वत: सरचिटणीस होते. त्यावेळी श्री शंकर देवांनी संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त केली होती. पंडित नेहरू द्वैभाषिकचा आग्रह करत होते. समितीचे राज्य पुनर्रचनेचे उद्दिष्ट सांगताना एस एम नी सांगितले " त्याचा पाया श्री हरिभाऊ पाटसकर फॉर्म्युला असावा की ज्यात भाषा हा घटक महत्वाचा आहे. प्रादेशिक सलगता असली पाहिजे. खेडं हा घटक धरला पाहिजे. " हेच पायाभूत उद्दिष्ट असावे असा समितीने आग्रह धरला. श्री एस एम नी भाषा हे घटक तत्व मानून इथे समाजवादी राज्य निर्माण व्हावे हे उद्दिष्ट

सांगितले. सर्व राजकीय पक्षांनी तसेच आचार्य अत्रे, कॉ. डांगे, सेनापती बापट, श्री उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, यांनी या उद्दिष्टाला पाठिंबा दर्शविला. समाजवादाचे उद्दिष्ट होते की सामान्यांना न्याय मिळावा, त्यांच्या किमान गरजा भागविल्या जाव्यात, शेतमजूर, गिरणी कामगार, सर्व सामान्य कष्टकरी, महिला वर्ग महाराष्ट्रात राहणारे विविध भाषिक गट यांच्या पर्यन्त न्याय व समता जावी. फक्त धनवंतांच्या मागे उभे राहायचे नाही. ह्यामुळे सर्व प्रभावित झाले होते. पुढे मुंबईचा प्रश्न मध्यवर्ती बनला. मुंबईसह महाराष्ट्र होण्यासाठी फाजलअली कमिशन, दार कमिशन, जवाहरलाल, वल्लभ भाई, पट्टाभी सीतारामअय्या, कमिटी यांनी विरोध केला. त्यांनी मुंबई गुजरात आणि महाराष्ट्र अशा 3 वेगळ्या राज्यांची कल्पना मांडली. मुंबई सातत्याने वेगळी ठेवण्याचा प्रयत्न केला. गिरणी कामगारानी विरोध केला. ही "ज. व. प. 'कमिटी कॉंग्रेसने नेमली होती. भाषा हे घटक तत्व मानले तर मुंबई महाराष्ट्रात येते. एस एम नी सांगितले की मुंबई महाराष्ट्रातच असावी. सर्वसामान्य माणसाचे राज्य निर्माण करावयाचे आहे. ही गोष्ट साधारणत: 1955 ते 1957 ह्या काळात घडली. शेतकऱ्यांना जेव्हा त्यांना डावलण्यात येत आहे हे कळले तेव्हा त्यांनी विरोध केला. "ज. व. प. " कमिटीने त्रिराज्याचा फॉर्म्युला दिला. मुंबई ही कोणाची ? धनदांडग्या धंनवंताची की घाम गाळून संपती निर्माण करणाऱ्या कष्टकऱ्यांची ? त्यानंतर एक अभूतपूर्व आंदोलन त्या काळात लढविले गेले.

कोणती उद्दिष्टे साध्य सफल झाली ह्यावर बोलताना म्हणाले, " आजचे राज्यकर्ते चुकूनही समता व समाजवादाचा उल्लेख करत नाहीत. हे तत्व घटनेत असूनही त्याचा उल्लेख होत नाही. त्यावेळी कॉंग्रेसने खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण ही भूमिका स्वीकारली. ग्याट (GAT) करारावर सह्या केल्यापासून समता व समाजवादाशी पूर्णपणे फारकत घेतली. समाजवादाचा काळं इंदिरा गांधीपर्यंत राहिला. पी. व्ही. नरसिंहरावांच्या काळात केंद्र सरकारने खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरणाची भूमिका स्वीकारली. भा. ज. पाने सार्वजनिक उद्योग विक्रीची भूमिका मांडली. विरोधी पक्ष भा. ज. प. महाराष्ट्र किंवा देशात समाजवादी भूमिका मांडत नाही. निर्गुंतवणुकीचे स्वतंत्र खाते श्री अरुण शौरींनी

निर्माण केले. सार्वजनिक उद्योग विक्रीची भूमिका घेतली. समाजाच्या दृष्टीने जे हितकारक असेल ते केले पाहिजे. तो समाजवाद.

सार्वजनिक उद्योगाबाबत अवाजवी मनुष्य भरती, काम न करण्याची मानसिकता, अनुत्पादकता, कामगारांची हडेलहप्पी त्यामुळे डबघाईला येणारे कारखाने हे जागतीकरणाच्या स्पर्धेत कसे टिकतील असे छेडले असता, म्हणाले " हे बरोबर नाही. त्यातील व्यवस्थापन गुणवान माणसाच्या हाती असावे. बँकांचे खाजगीकरण का होत नाही? रेल्वेचे का होत नाही? सार्वजनिक उद्योगाबाबत चुकीचा प्रचार केला जातो. राष्ट्रीयकरणापूर्वी सर्वसामान्य शेतकऱ्यांना, हातगाडीवाले यांना कर्जे मिळत नव्हती. आता मिळायला लागली. LIC 100% पटीने वाढली. महाराष्ट्र बँक खाजगीकरणापूर्वीची आणि आता पाहिली तर त्यांनी ठेव भरपूर वाढवली. राष्ट्रीयकरणामुळे भ्रष्टाचाराला सगळे रान मोकळे होते असे नव्हे. चांगल्या वृतीची माणसे असतील तर नक्कीच सुधारणा होत राहील. शासनाने काही गिरण्या ताब्यात घेऊन NTC निर्माण केली. ती खाजगी गिरण्यांच्या अपयशामुळे. अमेरिकेत खाजगीकरण असले तरी सर्वत्र मंदीची लाट आहे. सरकारने 100 बिलियन डॉलर्सची मदत केली आहे. कम्युनिस्ट राष्ट्रांप्रमाणे सरसकट राष्ट्रीयकरण चुकीचे आहे. तसेच सरसकट खाजगीकरणही चुकीचे आहे. कुठे काय महत्वाचे आहे त्याचा विचार करायला हवा. Defence, रेल्वे, शासनाच्या हातातच हवे.

राजकीय वातावरणाबाबत बोलायचे झाल्यास संयुक्त महाराष्ट्र समितीत कॉंग्रेस सोडून सर्व पक्ष होते, पंडित नेहरूंनी द्वैभाषिक राज्याची भूमिका घेतली. स. का. पाटलांनी मुंबई मिळणार नाही अशी भूमिका घेतली. श्री यशवंतराव चव्हाणांनी तर पंडित नेहरू किंवा संयुक्त महाराष्ट्र ह्या प्रश्नात ते नेहरूंच्या बाजुने असतील अशी भूमिका घेतली. कॉंग्रेस मधील नरवणे गट समितीच्या बाजूने होता.

श्री यशवंतराव चव्हाणांनी संयुक्त महाराष्ट्राचा कलश आणला यावर खुलासा केला, की ते द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होते. पंडित नेहरू वाईला येत असताना श्री यशवंतराव त्यांच्या समवेत होते. प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे उद्घाटन करण्यास पंडित नेहरूंना बोलावले होते. मी तेथे होतो. 50000 लोकांनी शिस्तबद्ध निदर्शने केली. कुणीही दगडफेक केली नाही. पंडित नेहरूंनी

लोक काय मागत आहेत हे श्री यशवंतरावाना विचारले. तेव्हा हे म्हणाले मुंबईसह महाराष्ट्र मागत आहेत. ही चळवळ प्रचंड दबाव घेऊन आली. चळवळीत 105 हुतात्मे झालेत, अनेकांनी राजीनामे दिलेत म्हणून मुंबईसह महाराष्ट्र झाला. जनतेने पंडित नेहरूंच्या तोंडून ते वदवून घेतले. श्री यशवंतरावांनी याचा साधा उल्लेखही कुठे केला नाही. शिवाजीपार्कच्या भाषणात कुणीही चळवळीसंबधी उल्लेखही केला नाही. हुताम्याना वंदन तर राहोच साधी आठवणही केली नाही. सत्ताधारी इतिहास विपर्यस्त करतात. रशियात टोर्टस्की (Tortski) या नेत्याचे नाव इतिहासाच्या पुस्तकातून गाळले आहे.

सामाजिक वातावरणाबद्दल बोलताना म्हणाले निवडणुका आल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीने सर्व ठिकाणी दलित लोकांना उभे केले. श्री बी. सी. कांबळे निवडून आलेत. दौंड मतदारसंघात श्री साळुंके दलित समाजाचे नेते इस्पितळात आजारी असतांनाही निवडून आलेत. नौशेर भरुचा पारशी असूनही धुळे जिल्ह्यातून निवडून आलेत. लोकांनी धर्म जाती असे काही बघितले नाही. ही संयुक्त महाराष्ट्राची ताकद होती. समितीचे राज्य आले असते तर सामाजिक अभिसरण वाढले असते.

शैक्षणिक फरकाबाबत म्हणाले की आजची परिस्थिती चांगली नाही. शिक्षण तज्ञांनी त्यावेळी प्राथमिक शिक्षणावर भर द्यावा असे सुचवले. जागृती निर्माण केली पण त्याच्या उलट्या बाजूने प्रवास सुरू आहे. शिक्षण हे सेवाव्रत होते. आज त्याचे स्वरूप बाजारी आहे. त्यातून सम्राट निर्माण झाले आहेत. प्रत्येकजण शाळा कॉलेज काढून धंदा करीत आहेत. सर्व राजकीय नेते स्वत:चे भत्ते वाढविण्यासाठी एकजुट करतात पण सामान्य माणसांचे प्रश्न आले की वेगळे होतात. समाजाचे भान राखत नाहीत. आज जो सेझ चालू आहे तो real estate धंदा झाला आहे. प्राथमिक शिक्षण 8 वी पर्यन्त मानले जावे असे राष्ट्रीय धोरण होते. पण महाराष्ट्रात 4थी पर्यंतचे शिक्षण प्राथमिक मानले जाते. राष्ट्रीय उत्पनाच्या 6% खर्च प्राथमिक शिक्षणावर करावयास हवा. आता 2. 84% खर्च होतो. ही आकडेवारी सर्व भारतीय स्तरावरची आहे. अपंग मुलांच्या शिक्षणाची अवस्था वाईट आहे. चीनमध्ये फक्त 6 सेझ आहेत. त्यांनी कॉटेज industry निर्माण करून निर्यात वाढविली.

आजच्या लोकशाही आणि समाजवादाबद्दल- बोलायचे झाल्यास लोकशाहीची चौकट आहे. पण त्यात लोकशाहीचे प्राणतत्व दुर्बल आहे. मतदान पद्धती आहे. मतदार जागृत आहे. आपल्याला हवे ते सरकार आणू शकतात. इंदिरा गांधींचा पराभव केला. अनेक मंत्री खासदार पराभूत केलेत. बाह्य चौकट चांगली आहे. प्रतिंनिधी कोण निवडून आणतात ज्याच्याकडे धनसत्ता, जात, धर्म, उपजातीचे पाठबळ आहे. तेच करू शकतात. गुंडांना एकत्र करण्याची ज्यांच्याकडे शक्ति आहे तेच निवडून येऊ शकतात, नगर जिल्हा सधन आहे. इथे सत्ता विशिष्ट लोकांच्या मुठीत आहे. जात ह्या घटकाचा वापर प्रबळपणे होतो. हे धनदांडगे वर्षानुवर्षे सत्तेला चिकटून आहेत. सत्ता आपल्याच घरात कशी राहील ह्याची काळजी घेतात.

ही परिस्थिति बदलायची असेल तर राजकारण जनतेच्या हितासाठी असावे. बहुजन हिताय बहुजन सुखाय ही भावना हवी. आज ही भावना कमी कमी होत आहे. आलेली सत्ता स्वत:च्या पक्षाच्या मुठीत येंनकेनप्रकारे कशी राहील ही भावना प्रबळ आहे. आपली शिक्षण व्यवस्था बदलायला हवी. जनतेत शिक्षण वाढायला हवे. आज 65% साक्षरता आहे. पण शिक्षण धंदा बनला आहे. आज अर्जदारला मंत्र्यांनी विचारले की तुला उद्योगासाठी परवाना पाहिजे की शाळा कॉलेज काढण्यासाठी परवाना पाहिजे. तो निश्चितपणे म्हणेल शाळा कॉलेजसाठी. त्यात भरपूर पैसा आहे. सर्वपल्ली राधाकृष्णन कमिशन, कोठारी कमिशन यांनी जे विचार मांडले ते कुठेच प्रतिबिंबीत झाले नाहीत. शिक्षणातून सतेज पिढी निर्माण व्हायला पाहिजे. परिक्षार्थी बाबू लोक बनवणारे आजचे शिक्षण आहे. शिक्षणाचे विकृतीकरण होत आहे. एकदा श्री विलासराव देशमुख भेटले तेव्हा शिक्षणावर चर्चा करीत असताना म्हणाले "अहो छत्तीसगडमध्ये इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर विद्यापीठ आहे."

आजच्या समाजवादाबद्दल म्हणायचे झाल्यास संत तुकारामानी म्हटले आहे "अहमता खंडावी ! समता वर्तावी !! जे पुत्रांना द्यावे तेची ! दासदासीना द्यावे !!" ह्या व्याख्येत समाजवाद आहे. समाजातल्या सर्व माणसांच्या किमान गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य रोजगार) मिळाव्यात. पूर्ण रोजगारची भाषा कोणी बोलत नाही तो समाजवादाचा मूळ गाभा आहे. आता कामगार कपात चालू आहे. बेकारी वाढत आहे. आपला देश शेतीप्रधान आहे. 65% शेती आहे. शेतीत रोजगार

निर्माण करू शकू. शेतीला पंचवार्षिक योजनेत दुसरी पंचवार्षिक योजना वगळता 11 ही पंचवार्षिक योजनेत महत्व दिले नाही.

40% सिंचित क्षेत्रातील जमिनीतील जे जमीनदार आहेत त्यांची स्थिती चांगली आहे. त्यांच्याकडे काम करणाऱ्यांची अवस्था काय आहे? तर विकट आहे. कोरडवाहु शेती 80% आहे. आत्महत्या वाढत आहेत. चांगले नियोजन नाहीत. गेल्या 16 वर्षात 1, 82, 000 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

राजकीय नेतृत्वाकडून अपेक्षा करायची झाल्यास नेत्यांनी स्वार्थ हेतु सोडावा. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवावा. गौतम बुद्धाचे वचन मनात ठेवावे. करोडो मुले शिक्षणापासून वंचित आहेत. त्यांना शिक्षण कसे मिळेल ते पहावे. कुपोषणाकडे नेते गंभीरपणे बघत नाहीत. नेत्यांनी राजकारण बदनाम केले. ते धंदा म्हणून पाहू नये.

आदर्श ठेवावा असे नेते कमी आहेत. डॉक्टर मनमोहनसिंग ही व्यक्ति चांगली आहे. त्यांच्या राजकीय धोरणांना विरोध असला तरी व्यक्ति चारित्र्यसंपन्न आहे. आंध्रचे मुख्यमंत्री कै. राजशेखर रेड्डी चांगले नेते होते.

चळवळी योग्य मार्गाने चालल्या आहेत का?

अनेक संस्था आहेत. पण त्यात co-ordinationचा अभाव आहे. मेधा पाटकरांनी नर्मदा आंदोलनाने विकासाचा प्रश्न उभा केला. त्याला जनाधार मिळाला नाही. लोकांचा दबावगट निर्माण झाला नाही. म्हणून आंदोलन यशस्वी झाले नाही. NGO व परदेशी आर्थिक मदत ह्यामुळे कुठलेही परिवर्तन होणार नाही. Activist ग्रुप वाढवले पाहिजे. त्यांनी सरकारवर दबाव आणला पाहिजे. राजकारणातही सक्रिय राहिले पाहिजे.

समाजवादी व कम्युनिस्ट पक्षाने समितीत एकत्र काम कसे केले?

आम्ही विरोधी पक्ष म्हणून एकत्र होतो, कम्युनिस्ट विचारसरणीतील एकपक्षीय हुकुमशाही तसेच विचारस्वातंत्र्यावरील बंधने आम्हाला मान्य नाहीत. असे प्रश्न आले तर आम्ही त्यांना विरोध करतो.

आजचे स्त्री नेतृत्व कसे विकसित करता येईल?

या संदर्भात सुप्त क्रांती होत आहे. 41 लाख बचत गट आहेत. 5 कोटी स्त्री सदस्य आहेत. स्त्री आता बाहेर पडत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कारभारात निर्णय प्रक्रियेत स्त्रिया पुढे येत आहेत. शाळा कॉलेज मध्ये स्त्रिया पुढे आहेत. 50% स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाले आहे. पुरुषांनी मानसिकता बदलली पाहिजे. घरातील स्त्रियांना वाव दिला पाहिजे. मंत्री खासदार मेल्यावर त्यांच्या घरातील स्त्रीला तिकीट मिळते. लालूनी राबडीदेवींना पुढे आणले. त्यांनी चांगले काम केले. सोनिया गांधी, सुषमा स्वराज, वृंदा करात. मेधा पाटकर ह्यांनी चांगले नेतृत्व गुण दाखविले. त्यांना वाव द्यायला पाहिजे त्यासाठी आरक्षण करायला हवे. लोकांची चळवळ शक्ति बनली पाहिजे. घटनेत बदल करायला हवा.

संयुक्त महाराष्ट्र होईल का? झालाच तर केव्हा?

होणारच. जेव्हा सगळे मराठी एकत्र येतील, दबाव गट वाढेल, तेव्हा होईल. कै. य. दी. फडक्यांनी समेलनात ठराव आणला. सूप्रीम कोर्टात केस चालू आहे. आपली केस समर्थपणे मांडायला हवी. आपले नेतृत्व कमी पडते. बेळगावकरांची दु:खे कुणी लक्षात घेत नाहीत. सरकारने चांगला वकील नेमून सर्वतोपरी मदत केली पाहिजे. सीमावादाचा लढा सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आहे. कानडी लोकांविरुद्ध नाही. संयुक्त महाराष्ट्र समितीने भाषिक द्वेष होऊ दिला नाही. बेळगाव महाराष्ट्रात आल्यास कुठलाही भाषिक असंतोष निर्माण होणार नाही. केस सुप्रीम कोर्टात आहे याचा अर्थ बेळगावचा प्रश्न शीतपेटीत गेला असा होत नाही.

संपूर्ण मुलाखतीत भाई सर्व गोष्टी सकारात्मक बोलत होते. त्यांच्यात आशावाद होता. त्यांचे विचार लोकांपर्यंत जातील. आजची युवा पिढी नक्कीच चांगली प्रगती करेल असा आशावाद घेऊन मुलाखत संपली

****

ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रहो, सहजासहजी काहीच मिळत नाही. केवळ अश्रू गाळून किंवा चिंता करून संकटं टळत नसतात. न स्वातंत्र्य, न मुक्ती, न प्रगती, न धन, न आरोग्य. काहीही मिळवायचं तर संघर्ष आणि श्रम करावेच लागतात. "गोलमाल" करून सर्व काही मिळवता येतं असा समज माध्यमांद्वारे सर्वत्र पसरवला जात असताना अशी पुस्तकं वाचून माणूस "जमिनीवर" येतो. आपल्याला आज मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी कोणी ना कोणी अतोनात कष्ट घेतलेले आहेत वा संघर्ष केलेला आहे. कोणतीच गोष्ट आपोआप मिळत नाही. प्रत्येकाचं मूल्य असतं.

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तकं विनामूल्य मिळतात. पण ती लिहिण्यासाठी लेखकांचे कष्ट व बुद्धी लागलेले असतात. आणि या एकेका पुस्तकाची किंमत म्हणून लेखक हजारो लाखो रुपये मिळवू शकतात. पण नाही. मराठी वाचकांना विनामूल्य पुस्तकं मिळावी, व मराठीत वाचन संस्कृती वाढावी म्हणून असंख्य लोक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांत ई साहित्य प्रतिष्ठान व हे सर्व लेखक सहभागी आहेत. आपण या अभियानात सहभागी झालात का?

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे.

esahity@gmail.com ला आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com